# <u>सतत विचारलेे जाणारे प्रश्न (कुसुम योजना)</u>

**१. सौर पंप म्हणजे काय?**

**उत्तर :-** सौर ऊर्जेवर चालणाऱ्या पंपास सौर पंप असे म्हणतात. सौर पंप इतर पंपापेक्षा महाग असतो परंतु त्याची आस्थापना सोपी व देखभाल दुरुस्ती कमी लागते. सौर पंपाचे आयुष्यमान जास्तीत-जास्त २० वर्षे असते परंतु वेळोवेळी सौर पॅनलची साफसफाई करणे आवश्यक असते. सदर पंप जेथे विद्युत पुरवठा पोहोचला नाही तेथे उपयुक्त असतात.

**२. सौर पंपांचे प्रकार किती?**

**उत्तर :-** सौर पंपाचे प्रकार खालीलप्रमाणे

- सबमर्सियल
- सरफेस
- डी.सी.
- ए.सी.

**३. सौर डी.सी. पंप काय आहेत?**

**उत्तर :-** सौर पंप डायरेक्ट करंटवर चालतो त्यामुळे सदर पंपामध्ये इन्व्हर्टर व बॅटरीचा वापर होत नाही.

**४. सौर पंपाचे फायदे काय?**

**उत्तर :-** सौर पंपाचे फायदे खालीलप्रमाणे

- शेतीचे सिंचन करणे.
- उन्हाळ्यामध्ये पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणात असतो. सौर पॅनलद्वारे उन्हाळ्यामध्ये जास्त वीज निर्मिती झाल्यामुळे सौर पंपाद्वारे जास्तीत-जास्त पाण्याचा उपसा करणे शक्य होते.
- ज्या ठिकाणी वीज पोहोचली नाही त्या ठिकाणी शेतीचे सिंचन करणे शक्य होते.

**५. सौर ऊर्जा कृषिपंप योजनेअंतर्गत किती घटक आहेत?**

**उत्तर :-** सौर पंपाचे घटक खालीलप्रमाणे

- **घटक-अ :-** या अंतर्गत जमिनीवर पारेषण संलग्न सौर अथवा इतर अपारंपरिक ऊर्जेचे २ मे.वॅ. पर्यंत विद्युत संच आस्थापित केले जातात.
- **घटक-ब :-** या अंतर्गत ७.५ एच.पी. क्षमतेपर्यंत पारेषण विरहित सौर कृषिपंप आस्थापित केले जातात.
- **घटक-क :-** या अंतर्गत ७.५ एच.पी. क्षमतेपर्यंत यापूर्वी आस्थापित झालेले पारेषण संलग्न सौर कृषिपंप सौर ऊर्जेद्वारे चालविले जातात.

**६. सौर ऊर्जा कृषि पंपाबाबत कोणती योजना आहे?**

- केंद्र शासनाने वापरात असलेले डिझेल पंप बदलने आणि पारंपरिक वीज न पोहोचलेल्या ठिकाणांसाठी पारेषण विरहित सौर पंपांसाठी शेतक-यांना अनुदान देणेसाठी कुसुम योजना जाहिर केली.

- शेतक-यांना दिवसा सिंचन करणे शक्य व्हावे व राज्य शासनाचे पारंपरिक पद्धतीने कृषीपंप जोडणीसाठी लागणा-या खर्चात व राज्य शासनाद्वारे सबसीडीपोटी देण्यात येणा-या अनुदानात बचतीचे उद्दिष्ट साध्य व्हावे, या करीता राज्यातील शेतक-यांना कृषी वापरासाठी पारेषण विरहित सौर कृषी पंप उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने महाकृषी ऊर्जा अभियांनांतर्गत या योजनेमध्ये सहभाग घेण्याचा निर्णय घेतला.
- नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय, नवी दिल्ली (MNRE) व राज्य शासनाने महाकृषि ऊर्जा अभियानांतर्गत प्रधानमंत्री कुसुम घटक-ब योजना राबविण्यासाठी एकूण १,००,००० नग सौर कृषिपंपास मान्यता दिली. राज्य शासनाने पुढील ५ वर्षात ५,००,००० सौर कृषीपप आस्थापित करण्यास मंजूरी प्रदान केली आहे. तसेच केंद्र शासनाद्वारे पुढील कालावधीत मंजुर संख्येत वाढ केल्यास, त्याचा समावेश या अभियानांतर्गत करावयाच्या ५,००,००० सौर पंप आस्थापित करण्यास राज्य शासनाने मान्यता दिली.
- MNRE व राज्य शासनाने मंजूरी केलेल्या १,००,००० नग सौर पंपामध्ये ६०००० नग ३ एच.पी. डीसी, ३०००० नग ५ एच.पी. डीसी व १०००० नग ७.५ एच.पी. डीसी पंपांचा समावेश आहे.  हे सौर पंप जेथे पारंपरिक वीज पोहोचलेली नाही अशा ठिकाणी आस्थापित करणेत येतील.

**७. सौर ऊर्जा कृषिपंप योजनेमध्ये सहभागासाठी लाभार्थ्याची पात्रता काय आहे?**

- ज्या शेतकऱ्यांकडे शाश्वत जलस्त्रोत उपलब्ध आहे, असे सर्व शेतकरी पात्र राहतील. मात्र अशा शेतकऱ्यांकडे त्याच गट नंबरमध्ये पारंपारिक पध्दतीने विद्युत जोडणी झालेली नसणे आवश्यक आहे.  तसेच HVDS खाली समावेश नसावा.  या गट नंबरमध्ये यापूर्वी अटल सौर कृषिपपं योजना-१ व २, मुख्यमंत्री सौर कृषिपंप योजनेचा लाभ घेतलेला नसावा.
- २.५ एकरापर्यंत शेतजमीन धारक शेतकऱ्यास ३ अश्वशक्ती क्षमते पर्यंतचे सौर कृषी पंप, २.५१ ते ५ एकरापर्यंत शेतजमीन धारक शेतकऱ्यास ५ अश्वशक्ती क्षमतेचा आणि ५ एकरावरील शेतजमीन धारक शेतकऱ्यास ७.५ अश्वशक्ती क्षमतेचा सौर कृषी पंप देय राहील.
- राज्यातील पारंपरिक ऊर्जेव्दारे विद्युतीकरण न झालेले शेतकरी, विद्युतीकरणासाठी वन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र मिळत नसलेले शेतकरी, कृषीपंपाचे अंतर नजीकच्या उच्चदाब वाहिनी पासून ६०० मीटरपेक्षा जास्त असल्यास अशा कृषीपंप अर्जदारांना पारेषण ववरहीत (Off Grid) सौर कृषीपंपाच्या माध्यमातून वीज जोडणी दिली जाईल.
- अतिदुर्गम भागतील शेतकरी, महाराष्ट्र शासनाच्या धडक सिंचन योजने अंतर्गत लाभ घेतलेले शेतकरी यांना सदर योजने अंतर्गत प्राधान्य राहील.
- वैयक्तिक किंवा सामुदायिक शेततळे, विहिर ,बोअरवेल यांचे मालक तसेच बारमाही वाहणारी नदी/नाले यांच्या शेजारील शेतजमीनधारक शेतकरी सुध्दा या योजनेसाठी पात्र राहतील.

- ज्या शेतकऱ्यांकडे बोअरवेल ,विहिर व नदी इ.ठिकाणी शाश्वत पाण्याचा स्त्रोत आहे याची खात्री महाऊर्जाद्वारे करण्यात येईल. तथापि जलसंधारण कामाच्या पाणी जिरविण्याच्या पाणीसाठ्यामधून पाणी उपसण्यासाठी सदर पंप वापरता येणार नाहीत.

**८. सौर ऊर्जा कृषिपंप योजनेमध्ये सौर पंप मिळण्यासाठी किती लाभार्थी हिस्सा भरावा लागेल?**

- सर्वसाधारण गटाच्या अर्जदारांकडून १० टक्के व अनुसूचित जातीच्या व अनुसूचित जमातीच्या अर्जदारांकडून ५ टक्के लाभार्थी हिस्सा म्हणून भरणे अर्जदारास आवश्यक राहील.

**९. सौर ऊर्जा कृषिपंप योजनेमध्ये मिळणाऱ्या सौर कृषिपंपाच्या अंदाजित किंमती, GST सह (वित्त वर्ष २०२०-२१ साठी जाहीर केलेल्या निविदेमध्ये प्राप्त किंमती)**

| **पंपांची क्षमता** | **३ एच.पी. (डी.सी.)** | **५ एच.पी. (डी.सी.)** | **७.५ एच.पी. (डी.सी.)** |
|---|---|---|---|
| पंपाची किंमत (रु.) | १९३८०३ | २६९७४६ | ३७४४०२ |

**१०. सौर ऊर्जा कृषिपंप योजनेमध्ये मिळणाऱ्या सौर कृषिपंपासाठी अंदाजित लाभार्थी हिस्सा, GST १३.८% सह**

| **प्रवर्ग** | **३ एच.पी.** | **५ एच.पी.** | **७.५ एच.पी.** |
|---|---|---|---|
| खुला | १९३८० | २६९७५ | ३७४४० |
| अनुसुचित जाती / अनुसुचित जमाती | ९६९० | १३४८८ | १८७२० |

**११. सौर ऊर्जा कृषिपंप योजनेमध्ये अर्जासोबत कोणती कागदपत्रे लागतील?**

- कुसुम योजनेमध्ये ऑनलाईन पद्धतीने अर्ज करताना पुढीलप्रमाणे कागदपत्रांची आवश्यकता आहे :-
  - i. ७/१२ उतारा (विहीर / कुपनलिका शेतात असल्यास ७/१२ उताऱ्यावर नोंद आवश्यक). एकापेक्षा जास्त नावे असल्यास इतर भोगवटाधारकाचे ना-हरकत प्रमाणपत्र.
  - ii. आधारकार्ड प्रत.
  - iii. रद्द केलेली धनादेश प्रत / बँक पासबुक प्रत.
  - iv. पासपोर्ट आकाराचे छायाचित्र.
  - v. शेतजमीन / विहीर / पाण्याचा पंप सामाईक असल्यास इतर भागिदाराचे ना-हरकत प्रतिज्ञापत्र.
  - vi. जातीचा दाखला (अनुसूचित जाती / जमाती प्रवर्गासाठी)
- ही कागदपत्रे वेबसाईटवर अपलोड करावयाची आहेत.

**१२. सौर ऊर्जा कृषिपंप योजनेमध्ये लाभार्थी हिस्सा कशा प्रकारे भरावा लागेल?**

- लाभार्थी हिस्सा भरण्यासाठी पुढील माध्यमांचा वापर करता येऊ शकतो.
  - i. महाऊर्जा / मेडाचे ऑनलाईन पोर्टलवर.
  - ii. महाऊर्जा / मेडाचे नावे धनाकर्षाद्वारे (वेबसाईटवर अपलोड करणे आहे).

iii. महाऊर्जा / मेडाचे नावे बँकेमध्ये चलनाद्वारे (वेबसाईटवर अपलोड करणे आहे).

**१३. सौर ऊर्जा कृषिपंप योजनेमध्ये ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्यासाठी सर्वसाधारण माहिती :-**

- महाऊर्जा/ मेडा मार्फत संकेतस्थळावर https://kusum.mahaurja.com/solar/beneficiary/register/Kusum-Yojana-Component-B लिंकवर क्लिक करणे.
- ऑनलाईन पद्धतीने मराठी किंवा इंग्रजी मध्ये वैयक्तिक व शेतीसंबंधी माहिती भरणे.
- अर्जासोबत नमूद कागदपत्रे अपलोड करणे व अर्ज दाखल करणे.
- यानंतर प्राप्त OTP, User Name व Password द्वारे Login करणे.
- अर्ज पूर्ण करण्यासाठी अर्जदाराची वैयक्तिक व जमीन विषयक माहिती, निवासी पत्ता, जलस्रोत व सिंचन माहिती, पिकांची माहिती, आवश्यक पंपाची माहिती व बँकेची माहिती भरणे.
- याप्रमाणे अर्ज दाखल केल्यानंतर पंपासाठी भरावी लागणारी रक्कम याबाबत SMS द्वारे माहिती तसेच पोर्टलवर कोटेशन मिळणे.
- कोटेशननुसार अर्जदाराने ऑनलाईन रक्कम भरल्यास पुरवठादार निवडीचा पर्याय उपलब्ध होणे.
- लाभार्थ्याने पुरवठादार निवडल्यानंतर सर्वसाधारणपणे पुढील ९० दिवसांच्या कालावधीमध्ये पंप आस्थापित होईल.

**१४.खुला प्रवर्ग म्हणजे काय?**

**उत्तर** :- अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व्यतिरिक्त इतर सर्व प्रवर्ग खुला प्रवर्गामध्ये येतात.

**१५.सौर पंप मिळण्याकरिता जमिनीबाबतच्या अटी व शर्ती काय आहेत?**

**उत्तर** :- २.५ एकर जमिनीपर्यंत-३ एच.पी. डी.सी. पंप, २.५ एकर पेक्षा जास्त ते ५ एकर जमिनीपर्यंत-५ एच.पी. डी.सी. पंप व ५ एकर पेक्षा जास्त जमिनीकरिता-७.५ एच.पी. डी.सी. पंप मिळणे शक्य आहे.